**सी.एन.आर. नं.एमएचएसआय—०७—०००६२—२००९**

**<u>नि.दि.मु.क्र. २५/२००९ मधील नि.क्र. १२१ ते १२३ वरील संयुक्तिक</u>**

**<u>आदेश</u>**

प्रस्तुतचे अर्ज मयत प्रतिवादी क्र. १ याचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून सदर प्रतिवादीविरुध्द दाव्याची कारवाई अवसान करण्याचा झालेला आदेश रद्दबातल करुन मिळणेची आणि अर्जातील नमूद वारसांना अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळणेसाठी व तशी दाव्याच्या सरनाम्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल करण्यात आलेले आहेत. तिनही अर्जातील मागण्या परस्परांशी संलग्न असल्याने प्रस्तुतचे अर्ज एकत्रितपणे विवेचनासाठी घेण्यात आलेले आहेत.

०२. नि.क्र. १२१ वरील अर्ज मयत प्रतिवादी क्र. १ याच्याविरुध्द त्याचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी, नि.क्र. १२२ वरील अर्ज प्रतिवादी क्र. १ हा दि. ३०/०१/२०१६ रोजी मयत झालेला असल्याकारणाने त्याच्याविरुध्द दाव्याची कार्यवाही अवसान करण्याचा झालेला आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी व नि.क्र. १२३ वरील अर्ज मयत प्रतिवादी क्र. १ याचे वारस अभिलेखावर घेण्याची व तशी अर्जातील नमूद वारसांना दाव्याच्या सरनाम्यात घेतल्याबाबतची दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०३. तिनही अर्जातील वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ हा दि. ३०/०१/२०१६ रोजी मयत झालेला असून त्याचे वारस अभिलेखावर घेण्यास सुमारे १ वर्षाचा विलंब झालेला आहे. सदर प्रतिवादी हा मयत झाल्याची कोणतीही माहिती प्रतिवादींनी वादीस दिली नव्हती. शिवाय प्रतिवादी क्र. १ याचे प्रतिवादी क्र. १ अ व्यतिरिक्त इतर वारस दाव्याच्याकामी पुर्वीच दाखल आहेत. केवळ प्रतिवादी क्र. १ अ हिचे नाव दाखल होण्याकरीता वरील प्रमाणे विलंब झालेला आहे त्यामुळे अर्ज मंजूर करण्यात यावेत. इत्यादी सर्व बाबी वादीतर्फे नमूद करण्यात आलेल्या आहेत.

०४. तिनही अर्जांवरील प्रतिवादी क्र. ३ याने म्हणणे सादर करुन अर्जास आक्षेप नोंदविलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ याच्या म्हणण्यानुसार अर्जातील नमूद

कारण संयुक्तिक नसल्याने अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहेत.

०५. वादीतर्फे आणि प्रतिवादी क्र. ३ याच्यातर्फे सुविद्य विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. असे दिसून येत आहे की, प्रतिवादी क्र. १ हा दि. ३०/०१/२०१६ रोजी मृत्यू झालेला आहे. अभिलेखावरुन प्रतिवादी क्र. २ ते ४ हे प्रतिवादी क्र. १ याचे वारस यापुर्वीच अभिलेखावर सामील आहेत. तथापि, प्रतिवादी क्र. १ अ ही प्रस्तुतकामी सामील पक्षकार नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्याचा पुर्णत्वाने गुणवत्तेवर न्यायनिर्णय होण्यासाठी प्रतिवादी क्र. १ अ हिची उपस्थिती दाव्याच्याकामी असणे ही आवश्यक बाब आहे. परंतु तिनही अर्ज दाखल करण्यास वादीने जो विलंब केलेला आहे, त्याकरीता तिच्यावर एकूण रक्कम रु.३००/— इतका खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे उचित राहील. सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. ३ यास देवू करणे न्यायोचित होईल. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

## **आदेश**

१. नि.क्र. १२१ ते १२३ वरील अर्ज वादीवर एकूण रक्कम रु. ३००/—(रुपये तीनशे फक्त) इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतात.

२. मयत प्रतिवादी क्र. १ याच्याविरुध्द दाव्याची कार्यवाही अवसान करण्याचा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येवून वादीस सदर मयत प्रतिवादीची श्रीमती जानकी श्रीराम कुबल या वारसास अभिलेखावर प्रतिवादी क्र. १अ म्हणून समाविष्ट करु देण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादीने प्रस्तुतचा आदेश झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत खर्चाची रक्कम जमा करावयाची असून; त्याप्रमाणे नि.क्र. १ वर सदर कालावधीत दुरुस्ती करुन घ्यावयाची आहे.

४. खर्चाची रक्कम प्रस्तुतचा आदेश झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत प्रतिवादी क्र. ३ यास अदा करण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :— २६ नोव्हेंबर, २०१८ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.